D-BACKUP 24-06-2014-DESKTOP आस्थापना dte

वाचले :- १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६८ व ६९
२) आदेश क्र. प्रशा/१/कावि/८३४/२०१३ दिनांक :- १८/६/२०१३
३) आदेश क्र. लेखा/१अ/६०/२०१७ दि. १८/१/२०१७
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३८५ दिनांक २४/५/२०१७
५) मा.आयुक्त यांचेकडील दि. /०६/२०१७ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/६४३/२०१७
दिनांक :- १४ /०६/२०१७

**विषय :- वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत...**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विविध प्रमुखांना कार्यालयीन कामाचे सोईचे दृष्टीने वेळोवेळी वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तथापि अगाऊ रक्कमा मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत. महानगरपालिकेचा दिवसेंदिवस वाढणारा कामकाजाचा व्याप विचारात घेता. कामकाज जलदगतीने व कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी अतिरिक्त आयुक्त तसेच विभाग प्रमुखांना ठराविक मर्यादेपर्यंत अगाऊ रक्कमा अदा करण्याचे अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमातील कलम ६८ व ६९ चे तरतुदीनुसार मा.स्थायी समितीचे मान्यतेने मा. आयुक्त त्यांचेकडील अधिकार महानगरपालिका अधिका-यांना प्रदान करु शकतात. मा.स्थायी समितीने ठराव क्र. ३८५ दिनांक २४/५/२०१७ अन्वये अतिरिक्त आयुक्तांना महापालिकेच्या सर्व विभागांकरिता र.रु १,००,०००/- (रक्कम रुपये एक लाख फक्त) व आदेश क्र. प्रशा/१/कावि/८३४/२०१३ दि. २८/६/२०१३ नुसार घोषित केलेले व त्यामध्ये वेळोवेळी केलेले/ होणारे बदलानुसार निश्चित केलेले विभागप्रमुखांना तातडीचे कामासाठी र.रु २५,०००/- (रक्कम रुपये पंचवीस हजार फक्त) मर्यादेपर्यंत अगाऊ रक्कमा अदा करणेचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता दिली आहे.

सबब, उपरोक्त मंजुर ठरावानुसार मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या आदेशान्वये अतिरिक्त आयुक्तांना महापालिकेच्या सर्व विभागांकरिता र.रु १,००,०००/- (रक्कम रुपये एक लाख फक्त) व आदेश क्र. प्रशा/१/कावि/८३४/२०१३ दि. २८/६/२०१३ नुसार घोषित केलेले व त्यामध्ये वेळोवेळी केलेले/ होणारे बदलानुसार निश्चित केलेले विभागप्रमुखांना तातडीचे कामासाठी र.रु २५,०००/- (रक्कम रुपये पंचवीस हजार फक्त) मर्यादेपर्यंत अगाऊ रक्कमा अदा करणेचे अधिकार प्रदान करणेस मान्यता देत आहे. सदर अधिकाराचा वापर संबंधितांनी संबधित कायद्याचे व वित्तीय नियमांचे काटेकोरपणे पालन करुन करावा.

प्रदान केलेल्या अधिकारांचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आलेस संबंधितावर नियमाधीन कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति – १) अतिरिक्त आयुक्त
२) सर्व विभागप्रमुख

प्रत – मु.ले.प. विभाग